महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

**मासं/रवका//न.क्र.०९/३६९९१**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. : ०२२ - २४०७७४४१

**दिनांक: १९.१२.२०२३**

# प रि प त्र क

**विषय :- महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मधील कर्मचाऱ्यांकरीता सन २०२४ या कॅलेंडर वर्षासाठी सार्वजनिक सुट्टया जाहीर करणेबाबत.**

**संदर्भ :-** १. महाराष्ट्र शासन अधिसूचना, असाधारण क्र. ११८ दि.०९.११.२०२३.
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. सार्वसु-११२३/प्र.क्र.१४८/जपुक (कार्या-२९) दि.१०.११.२०२३.

-----

प्रशासकीय परिपत्रक क्र. ०१ दि.२९.०९.२००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी **सन २०२४** या कॅलेंडर वर्षासाठी सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या **१८ सार्वजनिक सुट्टया** महावितरण कंपनीच्या प्रशासकीय कार्यालयांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकरिता कर्मचारी सेवा विनियमातील परिशिष्ट 'क' (APPENDIX-'A') मध्ये समाविष्ट केलेल्या पदांवर काम करणारे कर्मचारी व प्रशासकीय कार्यालयांव्यतिरिक्त इतर ठिकाणी काम करणारे कर्मचारी, तसेच सामान्य आदेश क्र. १२२ (क) दि.२२.०३.१९९० सोबतच्या परिशिष्ट 'क' (ANNEXURE-'A') आणि त्यानंतरच्या दि.०३.०४.१९९० व दि.१८.०८.१९९० च्या पूरकपत्रांमध्ये नमूद केलेल्या पदावर काम करणारे कर्मचारी वगळून यांना, सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' मध्ये विनिर्दिष्ट कलेल्या १८ (अठरा) सार्वजनिक सुट्टया जाहीर करण्यास मंजूरी प्रदान केलेली आहे. सदर सार्वजनिक सुट्टया या राज्य शासनाने परक्राम्य संलेख अधिनियम १८८१ (Negotiable Instruments Act १८८१) खाली घोषित केलेल्या सार्वजनिक सुट्टया आहेत.

२. कर्मचारी सेवा विनियमाशी संलग्न असलेल्या सामान्य आदेश क्र. १२२ (क) दि.२२.०३.१९९० सोबतच्या परिशिष्ट 'क' (APPENDIX-'A') अंतर्गत मोडणाऱ्या कर्मचाऱ्यांचे कामाचे ठिकाण विचारात न घेता त्या कर्मचाऱ्यांना तसेच कंपनीची प्रशासकीय कार्यालये वगळता विद्युत उपकेंद्र अथवा कार्यालये/ कार्यस्थाने (वर्क साईटस्/घटक/ आस्थापना) या ठिकाणी काम करणाऱ्या तांत्रिक कर्मचाऱ्यांना (ते कोणत्या परिशिष्टाखाली मोडतात हे विचारात न घेता) आणि सामान्य आदेश क्र. १२२ (क) दि.२२.०३.१९९० सोबतच्या परिशिष्ट 'क' (ANNEXURE-'A') व त्यासंबंधीची पूरकपत्रे दि.०३.०४.१९९० व दि.१८.०८.१९९० यामध्ये नमूद केलेल्या पदांवर काम करणारे कर्मचारी यांना प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्य दिन अगर त्याबद्दलची पर्यायी सुट्टी जमेस धरुन फक्त **६ (सहा) भरपगारी सुट्टया** जाहीर करण्यास मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी मंजूरी प्रदान केलेली आहे. सदर कर्मचाऱ्यांना वरील प्रमाणे ६ (सहा) सुट्टया ह्या (Employee Portal) प्रणालीतून सुट्टी सादर करून व प्रभारी अधिकाऱ्यांची पूर्व मंजुरी घेऊन उपभोगता येतील.

३. नाममात्र हजेरीपटावरील आणि कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना (नैमित्तिक कामगार वगळून) सन २०२४ या वर्षी प्रजासत्ताक दिन (दि.२६ जानेवारी) व स्वातंत्र्य दिन (दि.१५ ऑगस्ट) या दोन राष्ट्रीय सणांच्या दिवशी तसेच महाराष्ट्र दिन (दि.०१ मे) या राजकीय सणाच्या दिवशी भरपगारी सुट्टया मंजूर करण्यात आल्या आहेत. या सुट्टीच्या दिवशी काम करणारे कर्मचारी बदली किंवा पर्यायी सुट्टी मंजूर करुन घेण्यास पात्र राहतील.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**सहपत्र :-** सन २०२४- सार्वजनिक सुट्टयांची सूची (परिशिष्ट - 'अ')

**(भूषण कुलकर्णी)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(प्रकल्प)/(वाणिज्य)/(मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.

..१

३) कार्यकारी संचालक (सुवअं)/(पायाभूत आराखडा/ विशेष प्रकल्प)/(देयके व वसूली)/(वितरण)/(वित्त व लेखा)/ म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी अधिकारी/मुख्य तपास अधिकारी/कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)
५) मुख्य अभियंता (देयके व महसुल), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

परिपत्रक क्र. ३६९९१ दि. १९.१२.२०२३ चे परिशिष्ट 'अ'

## सार्वजनिक सुट्‌या - सन २०२४

**(क)** महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण क्र.११८ दि.०९.११.२०२३ अन्वये **सार्वजनिक सुट्‌या -२०२४**

| अ.क्र. | सुट्‌टीचा दिवस | इंग्रजी तारीख | वार |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | प्रजासत्ताक दिन | २६ जानेवारी, २०२४ | शुक्रवार |
| २ | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | १९ फेब्रुवारी २०२४ | सोमवार |
| ३ | महाशिवरात्री | ०८ मार्च २०२४ | शुक्रवार |
| ४ | होळी (दुसरा दिवस) | २५ मार्च, २०२४ | सोमवार |
| ५ | गुड फ्रायडे | २९ मार्च, २०२४ | शुक्रवार |
| ६ | गुढीपाडवा | ०९ एप्रिल, २०२४ | मंगळवार |
| ७ | रमझान ईद (ईद उल-फितर) (शव्वल -१) | ११ एप्रिल २०२४ | गुरुवार |
| ८ | रामनवमी | १७ एप्रिल, २०२४ | बुधवार |
| ९ | महाराष्ट्र दिन | ०१ मे, २०२४ | बुधवार |
| १० | बुध्द पौर्णिमा | २३ मे, २०२४ | गुरुवार |
| ११ | बकरी ईद (ईद-उल-झुआ) | १७ जून, २०२४ | सोमवार |
| १२ | मोहरम | १७ जुलै, २०२४ | बुधवार |
| १३ | स्वातंत्र्य दिन | १५ ऑगस्ट, २०२४ | गुरुवार |
| | पारशी नववर्ष दिन (शहेनशाही) | १५ ऑगस्ट, २०२४ | गुरुवार |
| १४ | ईद-ए-मिलाद | १६ सप्टेंबर, २०२४ | सोमवार |
| १५ | महात्मा गांधी जयंती | ०२ ऑक्टोबर, २०२४ | बुधवार |
| १६ | दिवाळी अमावस्या (लक्ष्मीपुजन) | ०१ नोव्हेंबर, २०२४ | शुक्रवार |
| १७ | गुरुनानक जयंती | १५ नोव्हेंबर, २०२४ | शुक्रवार |
| १८ | ख्रिसमस | २५ डिसेंबर, २०२४ | बुधवार |

**(ख)** खालील सुट्‌या या महिन्याच्या शनिवार व रविवारी येत असल्यामुळे त्यादिवशी प्रशासकीय कार्यालयांना सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आलेली नाही.

| अ.क्र. | सुट्‌टीचा दिवस | इंग्रजी तारीख | वार |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | १४ एप्रिल, २०२४ | रविवार |
| २ | महावीर जन्म कल्याणक | २१ एप्रिल, २०२४ | रविवार |
| ३ | गणेश चतुर्थी | ७ सप्टेंबर, २०२४ | शनिवार |
| ४ | दसरा | १२ ऑक्टोबर, २०२४ | शनिवार |
| ५ | दिवाळी (बलिप्रतिपदा) | ०२ नोव्हेंबर, २०२४ | शनिवार |
| ६ | भाऊबीज | ०३ नोव्हेंबर, २०२४ | रविवार |

**(ग)** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. सार्वसु-११२३/प्र.क्र.१४८/जपुक (कार्या-२९) दि.१०.११.२०२३ अन्वये मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयांकरीता खालीलप्रमाणे स्थानिक सुट्टी जाहीर करण्यात आलेल्या आहेत. तसेच, यापूर्वी मुख्य कार्यालयाचे परिपत्रक क्र. साप्रवि/सा/सा.सु./३५१७ दि.२१.०९.१९९६ अनुसार मुंबई शहर व मुंबई उपनगरातील जिल्हयांकरिता अनंत चतुर्दशी हा दिवस प्रतिवर्षी स्थानिक सुट्टी मानण्यात आला आहे.

| अ.क्र. | सुट्‌टीचा दिवस | इंग्रजी तारीख | वार |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | गोपाळकाला (दहीहंडी) | २७ ऑगस्ट, २०२४ | मंगळवार |
| २ | अनंत चतुर्दशी | १७ सप्टेंबर, २०२४ | मंगळवार |